जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2025

सकाळ



कोल्हापूर : डॉ. बी. डी. खणे यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनासाठी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

# महावीर अध्यासनासाठी एक लाखाची देणगी

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास अधिविभागप्रमुख तथा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. बी. डी. खणे यांनी गुरुवारी भगवान महावीर अध्यासनासाठी एक लाख रुपयाची देणगी दिली.

या अध्यासनाच्या नूतन प्रस्तावित इमारतीसाठी एक लाख रुपयांच्या दातृत्वनिधीचा धनादेश डॉ. बी. डी. खणे यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, सचिन खणे, उपकुलसचिव वैभव ढेरे, प्रल्हाद जाखले, अजित शेट्ये, विशाल शेट्ये उपस्थित होते. अध्यासनाच्या नूतन इमारत बांधकामास लवकरच सुरुवात होत आहे. या कार्यासाठी सढळ हस्ते देणगी द्यावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2025
पुढारी

# डॉ. अर्जुन चव्हाण यांना 'लाईफटाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ हिंदी लेखक, समीक्षक, प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांना विश्व हिंदी शोध संवर्धन अकादमी, वाराणसीच्या वतीने २०२५ चा 'लाईफटाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड' जाहीर झाला आहे.

दि. २३ मार्च रोजी वाराणसी येथील विश्व हिंदी शोध संवर्धन अकादमी बनारस व बनारस हिंदू विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात येणार आहे. डॉ. चव्हाण यांचे हिंदी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. ते ६० हून अधिक मौलिक, समीक्षात्मक, अनुदित तसेच संपादित ग्रंथाचे लेखक आहेत. काशीमध्ये होत असलेला सन्मान हा दक्षिण काशी कोल्हापूरकरांचा सन्मान आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

2 3 MAR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# देशातील १२० वर्षांचा पावसाचा अभ्यास

संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशात सरासरी किती पाऊस पडला आणि भविष्यात किती पडेल, यावर शिवाजी विद्यापीठातील संशोधक अभ्यास करत आहेत. वेगवेगळे प्रतिमाने वापरून या संशोधकांनी १२० वर्षांत पडलेल्या पावसाचा डेटा जमा केला असून, त्याचे विश्लेषणही केले आहे. लवकरच याचे निष्कर्ष आंतरराष्ट्रीय पत्रिकेत प्रसिद्ध होणार आहेत. पूर्वी पडणारा पाऊस आणि आताचा पाऊस याच्या विश्लेषणातून हवामानाचे संतुलन बिघडले आहे, असा प्राथमिक अंदाज या संशोधकांनी काढला आहे.

हवामान खात्याचा अंदाज किती खरा, किती खोटा यावर नेहमीच विनोदानेही चर्चा होत असते. त्यामुळे पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठातील पाच संशोधकांनी गेल्या पाच वर्षांपासून देशातील आयएमडीच्या ७४ केंद्रांतील पावसाच्या आकडेवारीचा अभ्यास सुरू केला. यामध्ये महाराष्ट्र, बिहार, पंजाब, हिमाचल, जम्मू-काश्मीर, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि मणिपूर, तसेच उर्वरित राज्यांतील पावसाची १९०० ते २०२० या १२० वर्षांच्या कालावधीतील पावसाचा सांख्यिकी अभ्यास केला आहे. जेथे सरासरीपेक्षा कमी आणि अधिक पाऊस बरसला, त्याचा नेमका परिणाम काय झाला, यावर काही निष्कर्ष या संशोधकांनी काढले आहेत. हा शोधनिबंध आयएमडीच्या मौसम या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेमध्ये प्रसिद्ध होताच तो निष्कर्ष जाहीर करण्यात येणार आहे.



## पुढील १० वर्षांतील हवामान बदलाचा अंदाज

या प्रकल्पामुळे पुढील १० वर्षांतील हवामान बदलाचे टप्पे आणि अंदाज फायदेशीर ठरणार आहेत. किती पाऊस पडत गेला आणि आता किती पडतोय याचा अभ्यास या संशोधकांनी केला आहे. पूर्वी पावसाळा ४ महिने होता, आता तिन्ही ऋतूत पाऊस पडतोय, याचेही विश्लेषण यात आहे. यातून पावसाचा कल समजणार आहे.

## कुलगुरुंसह हे आहेत पाच संशोधक

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के संख्याशास्त्रज्ञ म्हणून या प्रकल्पात सहभागी झाले आहेत. त्यांच्याशिवाय विद्यापीठाचे भूगोलशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, सरुड येथील शिवशाहू महाविद्यालयाचे भूगोलशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश वाघमारे, शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सोमनाथ पवार, वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रा. तुषार वाघमारे यांनी विविध प्रकारच्या सॉफ्टवेअर आणि मॉडेलच्या आधारे विश्लेषण केले आहे.

**या प्रकल्पासाठी आयआयटी आणि इस्रोच्या संशोधकांचे सहकार्य लाभलेले आहे. एमके चाचणी (मान किंडाल)सह चार प्रकारच्या चाचणीतून हवामान बदलाचे कल या संशोधकांनी मांडले आहेत.**